**सं.फौ.प्र.क्र./२२८/२०१८**
**सरकार –वि– सचिन**
**नि.क्र. ११ वर पुढे सुरू.**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं. ०७
मी शपथेवर खरे सांगतो की,
नावः — योगराज दिना कवडे,  वय– ३६ वर्ष,
कामधंदा –मजुरी, रा. बोदरा, तह. साकोली, जि.भंडारा.

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदाराचा सरतपास अधिवक्ता श्री. एन. के. गणवीर यांच्यामार्फत सुरु–**

मी आरोपीला ओळखतो. घटना कोणत्या वर्षी व कोणत्या ठिकाणी घडली याबाबत मला काही माहित नाही. पोलीसांनी माझे बयाण घेतले नाही.
सरतपास समाप्त.

**साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने न्यायालयाच्या परवानगीने साक्षीदारास उत्तरसुचक प्रश्न विचारण्याची परवानगी देण्यात आली.**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १६/११/२०१७ रोजी सायंकाळी ०५.०० वाजता मी आरोपीसोबत त्याच्या मोटरसायकल क्र.एम.एच./३६टी/५२०९ याने मौजा खैरी येथे मंडई पाहण्यास गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, रात्री ०८.०० वाजता पिंडकेपार रस्त्यावर आरोपीने त्याच्या ताब्यातील दुचाकी वेगाने चालवुन समोरच्या दुचाकीला धडक दिली.  हे म्हणणे खरे नाही की, त्यादिवशी आरोपीच्या चुकीने अपघात घडला होता. पोलीसांनी माझी सही घेण्याकरीता मला साकोली येथे बोलाविले होते. मला अभिलेखावरील माझ्या बयाणातील अधोरेखांकित भाग –अ वाचुन दाखविला. तो पोलीसांना बयाण देतांन मी सांगितला नव्हता. तो माझ्या बयाणात पोलीसांनी का नमुद केला याचे कारण मी सांगु शकत नाही.  हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचविण्यासाठी मी खोटी साक्ष देत आहे.
पुढील तपास समाप्त.

**उलटतपास आरोपीतर्फे अधिवक्ता श्री. एस. सी. बोरकर यांनी नाकारला.**

माझ्या समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत.
VISHAL MAHANAND GAIKWAD
Digitally signed by VISHAL MAHANAND GAIKWAD
Date: 2024.07.16 17:00:08 +0530
**(व्ही. एम. गायकवाड)**
न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, साकोली
**१६.०७.२०२४.**